| | |
|---|---|
| MHST090001451999 | नियमित दरखास्त क्र. ९१/२००१<br>नारायण तात्यासो जाधव<br>वि.<br>रविंद्र काशिनाथ तांदुळवाडकर,वगैरे. |

**नियमित दरखास्त क्र. ९१/२००१ मधील निशाणी २९ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत दरखास्तदार नारायण तात्यासो जाधव यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणे करिता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे प्रस्तुत अर्जातील कथनांप्रमाणे, दरखास्तदार नारायण तात्यासो जाधव हे दिनांक ०१.१२.२०१९ रोजी मयत झालेले आहेत. मयत दरखास्तदार यांची पत्नी यापुर्वीच दरखास्तदार म्हणून सामील झालेल्या आहेत. अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रस्तुतचे अर्जदार हे मयत दरखास्तदार यांचे वारस आहेत. सदर वारसांना या कामी दरखास्तदार म्हणून सामील करुन घेणे आवश्यक आहे. सबब अर्जात नमुद केलेप्रमाणे मयत दरखास्तदार यांचे कायदेशीर वारस दरखास्तदार म्हणून सामील करुन घेण्याची विनंती केली.

३. जाबदार यांनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज जाबदार यांचे म्हणण्याविना चालविण्यात आला.

४. प्रस्तुतचा अर्ज वाचला. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जदार यांनी कागद यादी निशाणी २८ सोबत मयत दरखास्तदार नारायण तात्यासो जाधव यांचा मृत्यूचा दाखला दाखल केलेला आहे. सदर मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता दरखास्तदार हा दिनांक ०१.१२.२०१९ रोजी मयत झाला असल्याचे दिसून येते. प्रस्तुत दरखास्तीचे स्वरुप पाहता दरखास्तदार यांचे वारसांना याकामी दरखास्तदार म्हणून सामील करुन घेणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज (निशाणी २९) मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार यांनी अर्जात नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती १० दिवसांच्या आत करावी. तसेच दुरुस्ती प्रत व त्याच्या आवश्यक प्रती तद्नंतर तात्काळ सादर कराव्यात.

३. खर्चासंबंधी आदेश नाहीत.

Digitally signed
by SAMEER
GOPAL GUNARI
Date: 2022.02.14
13:17:01 +05'30'

**दिनांक १०.०२.२०२२**
**ठिकाण – कोरेगांव**

**(समीर गोपाळ गुणारी)**
**दुसरे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर**
**कोरेगांव**